**महापारेषण**
महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

## सर्वेक्षक श्रेणी-२ (Surveyor Grade-2)

## या पदाच्या ऑनलाईन परिक्षेसाठीचे प्रवेशपत्र Download करण्याकरीता लिंक (Link)

---------

महापारेषण कंपनी अंतर्गत कार्यरत असलेल्या संबंधीत मुख्य अभियंता, अ.उ.दा. प्रकल्प नि संवसु परिमंडल कार्यालयांनी वेतनगट - ३ मधील मंडल सेवाजेष्ठतेमधील **सर्वेक्षक श्रेणी-२ (Surveyor Grade-2)** या पदासाठी सरळसेवा भरतीच्या जाहिराती जाहिरात क्र. ०१/२०१७ अन्वये प्रसारित केल्या होत्या.

२. त्या अनुषंगाने ऑनलाईन अर्ज यशस्वीरित्या सादर केलेल्या सर्व उमेदवारांची **ऑनलाईन लेखी परिक्षा ही दि. २०.०८.२०१७ रोजी आयोजित करण्यात येत आहे**.

३. **लेखी परिक्षेचे स्वरुप:-**

| अनु.क्र. | चाचणी | प्रश्न | गुण | परिक्षा कालावधी |
|---|---|---|---|---|
| १. | विषयाचे ज्ञान (Professional Knowledge) | ५० | ११० | एकत्रित कालावधी **१२० मिनीट** |
| २. | सामान्य अभियोग्यता (General Aptitude) | | | |
| | अ) तर्कशक्ती (Reasoning) | ४० | २० | |
| | ब) संख्यात्मक अभियोग्यता (Quantitative Aptitude) | २० | १० | |
| | क) मराठी भाषा (Marathi Language) | २० | १० | |
| | एकुण (१+२) | **१३०** | **१५०** | |

**टिप:-** ऑनलाईन लेखी परिक्षेत वस्तूनिष्ठ स्वरुपाचे (Objective Type) प्रश्न असतील

४. ऑनलाईन अर्ज यशस्वीरित्या सादर केलेल्या सर्व उमेदवारांना ऑनलाईन परिक्षेस बोलविण्यात येत आहे. ऑनलाईन लेखी परिक्षेस उमेदवारांना बोलविण्यापुर्वी त्यांच्या पात्रतेची म्हणजेच वय, शैक्षणिक अर्हता, अनुभव इत्यादी बाबतची पडताळणी करण्यात आलेली नाही. सबब, उमेदवाराने ऑनलाईन परिक्षेकरीता हजर होण्यापुर्वी जाहिरातीत नमूद केलेल्या विहित वय, शैक्षणिक अर्हता, अनुभव, प्रमाणपत्रे इत्यादी बाबी धारण करत असल्याची खात्री करावी.

५. ऑनलाईन परिक्षा प्रवेशपत्र (Call Letter), माहिती पुस्तिका (Information Handout), ऑनलाईन पहाणी चाचणी (Mock Test / Demo), लेखनिक पुरविण्याबाबत सुचना (Scribe) डाउनलोड करण्याकरीता या सुचनापत्राच्या शेवटी लिंक (Link) उपलब्ध करुन देण्यात आली आहे. उमेदवारांनी प्रवेशपत्र (Call Letter) व माहिती पुस्तिका व इतर सर्व सुचना परिक्षेस हजर राहण्यापूर्वी काळजीपुर्वक वाचावे.

६. उमेदवारांनी प्रवेशपत्र (Call Letter) डाउनलोड करण्याकरिता शेवटी उपलब्ध करून देण्यात आलेल्या लिंक (Link) वर Click करून "***प्रवेश पत्र डाउनलोड करण्यासाठी येथे लॉगिन करा***" या शीर्षकाखाली आपला नोदणी क्रमांक (Registration Number) व पासवर्ड (Password) नमूद करून प्रवेशपत्र डाउनलोड करावे."

७. **शासनाच्या तरतुदीनुसार दृष्टीहीन, अल्पदृष्टी आणि अस्थिव्यंग, सेरेब्रल पाल्सी, डिस्लेक्सियाने बाधित झालेल्या व्यक्ती लिहीण्यासाठी सक्षम नसल्यास व परिक्षेसाठी लेखनिकाची मागणी केली असल्यास, उमेदवाराने स्वत: व स्वखर्चाने लेखनिकाची व्यवस्था करावी. या संदर्भात खाली दिलेल्या "लेखनिक पुरविण्याबाबत सुचना (Scribe)" या लिंकवर देण्यात आलेल्या सुचनांप्रमाणे उमेदवारास Declaration Form भरुन द्यावा लागेल.**

८. ऑनलाईन परिक्षा प्रवेशपत्र (Call Letter) डाउनलोड करताना काही तांत्रिक अडचणी आल्यास त्या संबंधी उमेदवारांनी **022-26595228** या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा अथवा **callletter_helpdesk@mahatransco.in** या ई-मेल पत्त्यावर आपली समस्या नोंदवावी /पाठवावी. सदर ई-मेल हा दि.१८.०८.२०१७ (१४.०० वाजेपर्यंत) कार्यरत राहील.

९. उमेदवारांनी ऑनलाईन अर्जात नमूद केलेल्या ई-मेल पत्त्यावर प्रवेशपत्राची प्रत पाठविण्यात येत आहे.

१०. ऑनलाईल परिक्षेची तारीख, वेळ व ठिकाण याबाबतची माहिती परिक्षा प्रवेशपत्रावर (Call Letter) देण्यात आली आहे. उमेदवारांची परिक्षेचे केंद्र / स्थळ / दिनांक / वेळ यातील बदलाबाबतची कोणतीही विनंती विचारात घेतली जाणार नाही.

**११. ऑनलाईन परिक्षेस हजर राहण्याबाबतच्या सुचना:-**

ऑनलाईन परीक्षेस हजर होताना उमेदवारांना खाली नमूद केल्याप्रमाणे कागदपत्रे सादर करणे अनिवार्य राहिल अन्यथा उमेदवारास परिक्षेस बसता येणार नाही याची नोंद घ्यावी.

१) ऑनलाईन परिक्षेस उपस्थित राहण्याबाबत महापारेषण कंपनीने जारी केलेले वैध परिक्षा प्रवेशपत्र (Call Letter).

२) खाली नमूद केलेल्या प्रमाणपत्रांपैकी सद्यस्थितीत वैध असलेले कोणतेही <u>एक मूळ फोटो ओळखपत्र</u> (Original Photo Identity Proof) व त्याची <u>एक छायांकित प्रत</u> आणने बंधनकारक आहे. **फोटो ओळखपत्राची मूळ प्रत आवश्यक राहील.** रंगीत प्रत (Colour Copy) / नक्कल ओळखपत्र (Duplicate Identity Card) ग्राह्य धरले जाणार नाही.

*"पॅन कार्ड (PAN Card) / पासपोर्ट (Passport) /वाहन परवाना (Driving License) / मतदार ओळखपत्र (Voter's Card) / अलीकडचे छायाचित्र असलेले बँकेचे पासबूक (Bank Passbook with photograph) / राजपत्रित अधिकाऱ्याने अधिकृत letterhead वर जारी केलेले अलीकडचे छायाचित्र असलेले ओळखपत्र / लोकप्रतिनिधिने अधिकृत letterhead वर जारी केलेले अलीकडचे छायाचित्र असलेले ओळखपत्र / मान्यताप्राप्त महाविद्यालय / विद्यापिठाकडील अलीकडचे छायाचित्र असलेले ओळखपत्र (valid recent Identity Card issued by a recognized college / university) / छायाचित्र असलेले आधार कार्ड (Aadhar card with a photograph)/ई-आधारकार्ड (E-adhar card) / कर्मचारी ओळखपत्र (Employee ID) / अलीकडचे छायाचित्र असलेले बार कॉंसीलचे ओळखपत्र (Bar Council Identity card with photograph)"*

**३) महिला उमेदवारांसाठी:-**

महिला उमेदवारांचे <u>परिक्षा प्रवेशपत्रामध्ये</u> (Call letter) नमूद केलेले प्रथम नाव, वडिलांचे / पतिचे नाव, आडनाव व <u>छायाचित्र ओळखपत्रावर</u> नमूद केलेले प्रथम नाव, वडिलांचे/पतिचे नाव व आडनाव हे <u>एकसमान असणे आवश्यक आहे</u>. ज्या महिला उमेदवारांचे परिक्षा प्रवेश पत्रामध्ये (Call letter) नमूद केलेले प्रथम नाव, वडिलांचे / पतिचे नाव, आडनाव हे छायाचित्र ओळखपत्रावर नमूद केलेले प्रथम नाव, वडिलांचे/पतिचे नाव व आडनाव पेक्षा वेगळे असेल अशा महिला उमेदवारांना परिक्षेस बसता येणार नाही याची नोंद घ्यावी.

४) ऑनलाईन परिक्षेसाठी विहीत केलेल्या वेळेनंतर म्हणजेच प्रवेशपत्रात (Call letter) नमूद केलेल्या परिक्षा केंद्रावर हजर राहण्याच्या वेळेनंतर कोणत्याही कारणास्तव उशिराने हजर होणाऱ्या उमेदवारास परिक्षेस बसू दिले जाणार नाही. याबाबत कोणतीही सबब/कारण ग्राहय धरले जाणार नाही.

५) परिक्षा केंद्रावर भरती प्रक्रियेसंबंधीच्या विविध औपचारिकता पूर्ण करण्याच्या दृष्टीने अर्जदाराने परीक्षा प्रवेश पत्रात (Call letter) नमूद केलेल्या हजर राहण्याच्या वेळेच्या आधीच परिक्षाकेंद्रावर उपस्थित राहणे अपेक्षीत आहे.

**6) ओळख पडताळणी:-**

परिक्षा केंद्रांवर /परिक्षा सभागृहात उमेदवारास परीक्षा प्रवेशपत्र (Call letter), मूळ छायाचित्र ओळखपत्र (Original Photo Identity Proof) व त्याची छायांकीत प्रत (Photo Copy) पर्यवेक्षकाकडे सादर करावी लागेल. उमेदवाराच्या ओळखीची पडताळणी ही त्याने/तिने सादर केलेली कागदपत्रे तसेच हजेरीपट यावरून करण्यात येईल. त्यामध्ये उमेदवार स्वत:ची ओळख सिध्द करण्यास असमर्थ ठरल्यास अशा उमेदवारास परिक्षेस बसता येणार नाही याची नोंद घ्यावी.

१२. उमेदवाराने ऑनलाईन परिक्षेस स्वत:च्या जोखीमवर व स्वखर्चाने उपस्थित रहावे. महापारेषण कंपनी कोणत्याही प्रकारच्या दुखापतीस अथवा हानीस जबाबदार राहणार नाही.

- **परिक्षा प्रवेशपत्र Download करण्याकरिता येथे Click करावे.**
- **माहिती पुस्तिका (Information Handout English Marathi)**
- **लेखनिक वापरण्यासाठी अपंग उमेदवारांना मार्गदर्शक तत्वे**
- **ऑनलाईन पहाणी चाचणी (Mock Test / Demo)**

**ठिकाण: मुंबई** **सही/-**

**दि. ०५.०८.२०१७** **मुख्य महाव्यवस्थापक (मासं)**

******